क्रमांक : ८९६४ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १४ जून, २०२१

**:: प रि प त्र क ::**

महाराष्ट्र विधीमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संसदीय अभ्यास व प्रशिक्षण संस्था, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत क्षमता अभिवृद्धी कार्यक्रमांतर्गत माननीय संसद सदस्य तसेच अधिकारी/कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकरिता फ्रेंच, जर्मन, जपानी, पोर्तुगीज, रशियन आणि स्पॅनिश या आंतरराष्ट्रीय भाषांचे तसेच बंगाली, गुजराती, मराठी, ओडिया, तामिळ आणि तेलगू या भारतीय अनुसूचितील सहा भाषांचे दुरदृश्यप्रणालीद्वारे (ऑनलाईन पद्धतीने) मुलभूत प्राथमिक प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. सदरहू कार्यक्रमाचा एकूण कालावधी ३० तासांचा असून एकूण ३ महिन्यात २४ प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येणार असून प्रत्येक आठवड्याला ७५ मिनिटांचे २ प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहेत. याबाबतचा तपशील सोबतच्या विवरणपत्र 'अ' मध्ये नमूद केले आहे.

मा.अध्यक्ष, लोकसभा यांच्याहस्ते सदर भाषा प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन दिनांक २२ जून, २०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण वर्ग दुरदृश्यप्रणालीद्वारे (ऑनलाईन पद्धतीने) घेण्यात येणार असल्याने महाराष्ट्र विधीमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना देखिल यामध्ये सहभागी होता येणार आहे.

संसदीय अभ्यास व प्रशिक्षण संस्था, लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध भाषा प्रशिक्षण कार्यक्रमास महाराष्ट्र विधीमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील सदस्य यांना सहभागी होता येणार असल्याने सदर प्रशिक्षणास इच्छुक प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या भाषा निवडीबाबत pride@sansad.nic.in या संकेतस्थळावर सोमवार, दिनांक १४ जून, २०२१ रोजीपर्यंत परस्पर लोकसभा सचिवालयास कळविण्यात यावे.

( जयवंत राणे )
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

...२/-

\\Mis-c९०७\d\PJT\PJT-२०२१\Training\Circular.docx

**प्रति,**

दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी.

६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

७) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) निवडनस्ती.

<u>विवरणपत्र-अ</u>

# लोकसभा सचिवालय

## संसदीय अभ्यास व प्रशिक्षण संस्था (PRIDE)

### प्रशिक्षणाचे वेळापत्रक

| वार | प्रशिक्षणाचा दिनांक व वेळ | | | |
|---|---|---|---|---|
| | दि.२२ जून, २०२१ पासून | | दिनांक ५ जुलै, २०२१ पासून | |
| | सकाळी १०.०० ते सकाळी ११.१५ वाजेपर्यंत | सकाळी ११.३० ते दुपारी १२.४५ वाजेपर्यंत | दुपारी २.३० ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत | दुपारी ३.४५ ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| सोमवार | फ्रेंच | जर्मन | तामिळ | बंगाली |
| मंगळवार | स्पॅनिश | पोर्तुगीज | गुजराती | मराठी |
| बुधवार | जपानी | रशियन | तेलगू | ओडिया |
| गुरुवार | फ्रेंच | जर्मन | तामिळ | बंगाली |
| शुक्रवार | स्पॅनिश | पोर्तुगीज | गुजराती | मराठी |
| शनिवार | जपानी | रशियन | तेलगू | ओडिया |
| रविवार | सुट्टी | | | |